**L. A. BILL No. II OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६२ चा महा. ५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि,

२०२५ चा महा. अध्या. १४. म्हणून, त्यांनी दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

(शा.म.मु.) एचबी ३१७७–१(२४५–३-२०२६)

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे),याच्या कलम १४ मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :- १९६२ चा महा. ५.

"(२) राज्य शासन, अशा निवडणुका घेण्याकरिता नियम करील आणि अशा निवडणुका, त्या नियमांनुसार घेण्यात येतील.

(३) नामनिर्देशन पत्रे स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल आणि त्यास कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२५ चा महा. अध्या १४.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना, नियम किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**[ सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २. ]**

**[ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. जयकुमार गोरे,**

ग्रामविकास मंत्री.**]**

**[ विधानसभेने दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**[ विधानपरिषदेने दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**डॉ. विलास आठवले,**

सचिव-३,

महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.